मराठी साहित्यातील नंदादीप-

# कॅप्टन मा. कृ. शिंदे



लेखक

## गुं. फ. आजगांवकर

मराठी साहित्यातील नंदादीप–

# कॅप्टन मा. कृ. शिंदे (मिलिंदमाधव)

व्यक्ति आणि कार्य

संक्षिप्त परिचय



लेखक

गुं. फ. आजगांवकर

प्रकाशक :

**गुं. फ. आजगांवकर**
संचालक, प्रबोधन रिसर्च असोसिएट्स
१७, के. जी. बी. निवास, मॅजेस्टिक समोर
गिरगाव, मुंबई– ४०० ००४.

प्रथमावृत्ती : १९८६

**किंमत : ५ रुपये**

मुद्रक :

सौ. **माधुरी मधुकर म्हात्रे**
नरेश मुद्रणालय
चेंढरे, अलिबाग, रायगड.

# अर्पण पत्रिका

कोकणच्या आम जनतेत– जनमानसांत– ज्यांना अनन्य साधारण आदराचे स्थान प्राप्त झाले आहे त्या– श्री. **भालचंद्र अनंत** तथा **भाईसाहेब सावंत** व त्यांच्या सुशिल पत्नी सौ. **लीलादेवी सावंत** ह्या उभयतांस वाङ्मय क्षेत्रांतील एका अग्रगण्य साहित्य महर्षींचे संक्षिप्त चरित्र आदरपूर्वक अर्पण.

**––गु. फ. आजगांवकर**

# पत्रकार कॅप्टन शिंदे

१९३० पासून पत्रकारितेला सुरुवात. प्रगति, मौज, मनोरंजन, प्रेक्षक, निर्झर, प्रभात, नवजीवन वगैरे अनेक नियतकालिकात नियमित लेखन.

१९३० सहसंपादक ' तिरंगी झेंडा ' मासिक.

१९३२ संपादक ' शांति ' साप्ताहिक.

१९३३ सहसंपादक ' निर्भीड ' साप्ताहिक १९३८ पर्यंत.

१९३५ संपादक ' नवमत ' मासिक, **या मासिकातील श्री. शिंदे यांचा पहिला अग्रलेख, साहित्य सम्राट श्री. न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांनी ' अर्वाचीन मराठी साहित्य ' या ग्रंथाच्या उपसंहारात स्वमताच्या पुष्टचर्थ उद्‌धृत करून घेतला आहे.** (पृ. क्र. ६०–३)

१९३८ संपादक ' भारती ' मासिक.

१९३८ संपादक ' रसिक ' साप्ताहिक.

१९४६ नियमित लेखन ' झंकार '– टोपण नाव का. न. डोळे शिवाय धनुर्धारी साप्ताहिकात ' पापामिया ' या नावाने व खऱ्या नावाने विपुल लेखन. त्याचप्रमाणे ' प्रवासी ' (साप्ताहिक), नवे जग, वसंत, लोकमान्य (सं. दत्तोपंत सावरकर), तारका (साप्ताहिक), करमणूक (सं. न. रा. जोशी), लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, नवाकाळ, सुगंध, सत्यवादी इत्यादी अनेक नियतकालिकांत स्तंभलेखन, नाटच चित्रपट ग्रंथपरीक्षणे वगैरे विपुल प्रासंगिक लेखन. **मुम्बईतील ५७–५८ वर्षांच्या वास्तव्यापैकी सुमारे ४३ वर्षे पत्रकारितेशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध–**

१९७१, ६–१ एक वयोवृद्ध ज्येष्ठ पत्रकार म्हणून मुंबई मराठी पत्रकारसंघातर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

१९७८, २१–६ मुंबई मराठी पत्रकार संघाने समारंभपूर्वक सन्मान्य सभासदत्व बहाल करून एक पदक दिले.

१९८१, २०–३ मुंबई महापालिकेने महापौरांच्या हस्ते एक जुने पत्रकार म्हणून समारंभपूर्वक सत्कार करून शाल श्रीफळ व एक पदक बहाल केले.

आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारानेच त्यानी **' पत्रकार आणि पत्रकारिता '** हा उपयुक्त ग्रंथ लिहिला.

### एक तपस्वी व व्यासंगी साहित्यिक

# कॅप्टन मा. कृ. शिंदे (मिलिंदमाधव)

श्री. माधवराव कृष्णाजी शिंदे तथा कवि मिलिंदमाधव यांचा जन्म जुन्या रत्नागिरी जिल्ह्यातील म्हणजेच सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले या इतिहासप्रसिध्द शहरात ता. ३ सप्टेंबर १९०८ या दिवशी पहाटेस झाला. दोन मुलींच्या पाठीवर मोठ्या नवसाने त्यांचा जन्म झालेला, म्हणून केवळ त्यांच्याच मंडळीकडून नव्हे तर आसपासच्या अनेक लोकांनी त्यांचे खूप कौतुक केले. ते सर्वच शेजाऱ्या-पाजाऱ्यांचे व नातेवाईकांचेही अतिशय लाडके होते. शालेय जीवनांतही त्यांच्या गुरुजनांनी त्यांच्यावर फार प्रेम केले. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षापासून शिंदे काव्यरचना करू लागले. त्यासाठी त्यानी 'मिलिंदमाधव' असे टोपण नाव धारण केले. त्यांच्या लेखनवाचन छंदाची स्फूर्ति त्यांच्या आद्य गुरु त्यांच्या आत्याबाई श्रीमती उमाबाई नाईक या योगिनीतुल्य माऊलीकडून त्याना मिळाली, आणि त्या छंदाला प्रोत्साहन देणारे

श्री. गोखले मास्तर (प्रा. डॉ. वा दा. गोखले, M. A. Ph. D.) नंतर देवासारखे त्यांना भेटले. तेच त्यांचे दोन गुरु होत. त्या दोन गुरूंचे शुभ शीर्वाद हेच आपले सामर्थ्य, असे ते कृतज्ञतेने आजही मोठ्या अभिमानाने सांगतात. त्यानी नाट्य. साहित्य, युद्धकला, समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास केलेला असला आणि संस्कृत ही त्यांची आवडती भाषा असली, तरी त्यांच्या वाङमयीन पिंडाचे पोषण संतवाङ्मयानेच झालेले आहे.

**लेखन व्यवसाय** : मॅट्रिकपर्यंत शिक्षण वेंगुर्ले येथील त्यावेळच्या जॉर्ज इंग्लिश स्कूलमध्ये पूर्ण झाल्यावर ते मुंबईला आपल्या बहिणीकडे (श्री सोनाा तानाजी नाईक व सौ. सुंदराबाई सो. नाईक) खोताच्या वाडीत १९२९ साली आले आणि काही काळ सरकारी नोकरी करून १९३० साली लेखन व्यवसायाला सुरुवात केली. तो काळ स्वातंत्र्य चळवळीचा ! प्रथम त्यानी ' प्रभातफेरीची गाणी ' रचली आणि ती ' राष्ट्रीय पद्यावली ' या नावाने, त्यांचे मित्र श्री. भालचंद्र पांडुरंग सामंत यानी छापून प्रसिद्ध केली. परंतु त्यावेळच्या ९० व्या ऑर्डिनन्सने ती जप्त झाली. ती गाणी म्हणत म्हणत अनेक स्वातंत्र्यसैनिक तुरुंगात गले आणि मिलिंदमाधव मात्र ' गांधी माहात्म्य ' हे म. गांधींचे राजकीय (ओवीबद्ध) चरित्र लिहित बसले. श्री. सामंत यानीच ते ' गांधी माहात्म्य ' प्रसिध्द केले होते. तेव्हापासून पुढे ते मौज, धनुर्धारी, निर्भीड इत्यादि अनेक नियतकालिकांतून सातत्याने कथा, कविता, लेख, पुस्तकपरीक्षणे, नाट्य-चित्रपट समीक्षणे वगैरे विविध प्रकारचे लेखन करू लागले. सध्या जातिभेद नष्ट करण्यासाठी मिश्रविवाह व्हावेत हा विचार मूळ धरीत आहे. परंतु १९३१ साली श्री. शिंदे यानी आपल्या ' बंडखोर कुमारी ' या पहिल्याच नाटकात तोच विचार प्रभावीपणे मांडलेला आहे. याच नाटकात नायकाची भूमिका करून नटवर्य श्री. रामचंद्र वर्दे हे प्रथम मराठी रंगभूमीवर आले. आणि पुढे ' दासबुवा परुळेकर' या नावाने प्रसिध्दीला आलेले प्रसिध्द कीर्तनकार श्री. कृष्णाजी मुकुंद परुळेकर हे त्या नाटकात एक मुख्य भूमिका करीत असत. ' बंडखोर कुमारी ' नंतर गृहलक्ष्मी, गुंतागुंत अर्थात् दोरीचा साप,

बनावट बायको इत्यादी अनेक नाटके शिंदे यानी लिहिली आणि ते एक यशस्वी मराठी नाटककार म्हणून प्रसिध्दीला आले. महाराष्ट्रात व गोव्यात त्यांच्या नाटकांचे शेकडो प्रयोग झाले आहेत.

**विविध क्षेत्रात संचार**: वृत्तपत्रसृष्टी, नाट्यसृष्टी, सिनेमासृष्टी आणि लष्करी सृष्टी अशा विविध क्षेत्रातही त्यानी मनसोक्त संचार केला. मुंबई मराठी साहित्य संघ (१९३४) आणि मुंबई मराठी पत्रकार संघ (१९४१) या संस्थांच्या पिंडरचनेपासून अनेक वर्षे ते प्रमुख कार्यकर्ते होते. १९३५-३६ च्या दरम्यान त्यांचा चित्रपटसृष्टाशी संबंध आला. मिनर्व्हा फिल्म कं., द्वारका पिक्चर्स, नॅशनल स्टुडिओज वगैरे कंपन्यात त्यानी सहदिग्दर्शक, संवाद पद्यलेखक, संवाद दिग्दर्शक म्हणून कामे केली आणि सिनेमातंत्र आत्मसात केले. या अनुभवाचा उपयोग त्याना सी. के. एस. फिल्म प्रॉडक्शन ग्रूप- आय. ए. ओ. सी. ह्या लष्करी चित्रपट निर्मिती करणाऱ्या खात्यांत असताना झाला. त्यांनी अनेक लष्करी शैक्षणिक, प्रचारात्मक रिक्रूट भरती इत्यादी विषयावरील चित्रपटासाठी पटकथा, संवाद, गाणी लिहिली आणि मराठी, हिंदी, मल्याळम् इत्यादी भाषातील लष्करी विषयावरील बोलपटही दिग्दर्शित केले. प्रसिद्ध गायक- गायिकांनी गायिलेल्या त्यांच्या गीतांच्या ध्वनिमुद्रिका एच. एम. व्ही., ट्वीन, कोलंबिया, नॅशनल ग्रामाफोन कं., रेनबो रेकॉर्ड कंपनी, इत्यादीनी तयार केल्या होत्या.

**लष्करी पेशा व नंतर**: दुसऱ्या जागतिक महायुध्दकाळात त्याना किंग्ज कमीशन घ्यावे लागले आणि शिंदे सेकंड लेफ्टनंटच्या हुद्यावर लष्करात दाखल झाले. पुढे कॅप्टनच्या हुद्यापर्यंत त्यांची बढती झाली. आणखी एक महिन्याने मेजरचा हुद्दा मिळणार होता, परंतु त्यांच्या कौटुंबिक अडचणीमुळे त्यानी स्वेच्छेने कमिशनचा त्याग केला आणि परत नागरी जीवनाला सुरुवात केली. मात्र त्यावेळेपासून त्याना कॅप्टनचा ऑननरी हुद्दा मिळाला व तसे संरक्षण खात्याच्या राजपत्रात जाहीर करण्यात आले. लष्करी पेशा हा शिंदे यांच्या घराण्याचा वंशपरंपरागत पेशा आहे, असे म्हणायला हरकत नसावी. कारण त्यांच्या घराण्याचे

मूळपुरुष निमाजी शिंदे हें श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात होते इ. स. च्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात (इ. स. १६८३ साली) शिवाजी महाराजांचे सैन्य आचरे, कुडाळ, वेंगुर्ले वगैरे भागांत आले, त्याचवेळी शिंदे यांचे पूर्वज प्रथम वेंगुर्ले येथे आले आणि तेथेच स्थायिक झाले. ते मुळचे कोल्हापूर जिल्ह्यातील पारगडचे म्हणूनच पूर्वी 'शिंदे गडकरी मोकाशी' असे त्यांचे लांबलचक आडनाव होते. ते नंतर 'शिंदे' एवढेच सुटसुटीत करण्यात आले. शिंदे हे आडनाव लक्षात घेता, पूर्वी कधीतरी हिंदुस्थानावरील परकीयांच्या आक्रमणामुळ सिंधमधील शिंदे (Seinde Distriet) या तत्कालीन प्रसिध्द जिल्ह्यातून हे नागशेषवंशी क्षत्रिय लोक दक्षिणेकडे येऊन स्थायिक झाले असावेत असे एक तर्कशुध्द अनुमान निघते. श्री. शिंदे यांचे पणजोबा व आजोबा हे देखील सैन्यात होते. आजोबा रामजी भिकाजी शिंदे यानी सैन्यातील नोकरी सोडल्यानंतर वेंगुर्ले येथील दिवाणी कोर्टात बेलीफ म्हणून नोकरी पत्करली आणि तोच वारसा शिंदे यांच्या वडिलांनी पुढे चालविला. वडील कृष्णराव रामजी शिंदे हे शिरिस्तेदारच्या हुद्यावर असताना सेवानिवृत्त झाले.

**४२ चे आंदोलन**— लष्करातून मुक्त झाल्यानंतर त्यानी ४२ चे आंदोलन हे राष्ट्रीय स्वरूपाचे नाटक लिहिले आणि ते फार गाजले. याच नाटकात जागतिक कीर्तीच्या सिनेमा अभिनेत्री श्रीमती दुर्गाबाई खोटे यानी एक महत्त्वाची भूमिका करून मराठी रंगभूमीवर प्रथम पदार्पण केले. त्यानी आपल्या आत्मचरित्रात एके ठिकाणी ती सत्य घटनाही नमूद करण्याचा मनाचा मोठेपणा दाखविलेला आहे. त्या नाटकाचे मुंबई, पुणे, नाशिक येथेंही प्रयोग झाले. त्या नंतर ते भारत सरकारच्या चित्रपट विभागात मराठी भाष्यलेखक व निवेदक म्हणून अनेक वर्षे नोकरीला होते. ते बरीच वर्षे जे. पी. आणि काही काळ स्पेशल एक्झिक्यूटिव्ह मॅजिस्ट्रेटही होते.

**साहित्य निर्मिती** : लेखन हाच कॅप्टन शिंदे यांच्या जीवनाचा स्थायीभाव असून कवी, नाटककार, पत्रकार, लघुकथा लेखक, माहिती-

पट निर्माता, दिग्दर्शक, पटकथालेखक, भाष्यलेखक, निवेदक, लोकप्रिय वक्ते व समाजसेवक अशा विविध स्वरूपात त्यानी मराठी साहित्य समृध्द केलेले आहे. आजपर्यंत त्यांची सुमारे १११ लहानमोठी, गद्यपद्य पुस्तके प्रसिध्द झाली असून त्यांच्या धार्मिक पोथ्या तर महाराष्ट्रात घरोघर श्रध्देने वाचल्या जातात. त्यानी विविध प्रकारची विपुल वाङमयसेवा केलेली असून त्यांना '**वाङमयवीर**' हीच पदवी अधिक शोभून दिसेल. मराठी विश्वकोशासाठीही त्यानी अनेक नोंदी लिहिल्या. महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृति मंडळाने आंग्ल नाटककार शेक्सस्पीअर यांच्या चतुर्थ शत्सांवत्सरी निमित्त जो 'शेक्सपिअर परिचय' नावाचा प्रातिनिधिक स्वरूपाचा अभ्यासनीय ग्रंथ प्रसिध्द केला, त्यातील कॅप्टन मा. कृ शिंदे यांचा 'शेक्सपीअरकालीन रंगभूमी' हा लेख म्हणजे शिंदे यांच्या चिंतनशीलतेचा अभ्यासू वृत्तीचा आणि चिकित्सक प्रतिभेचा उत्तम नमुनाच आहे. लेखन हा आपला धंदा नसून धर्म आहे, असेच ते मानतात आणि त्याच वृत्तीने ते वागतात. अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक संस्थाशी त्यांचे निकटचे सबंध आहेत. एकेकाळी गाजलेल्या 'साहित्य झब्बूशाही मंडळ' (१९३४) या मंडळाचे ते एक संस्थापक आहेत. त्याचप्रमाणे 'मुंबई मराठी नाटककार संघ' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष (१९५५) आहेत.

**सत्कार समारंभ वगैरे :** त्यांच्या बहुविध साहित्यसेवेबद्दल मा. ना. **यशवंतराव चव्हाण** यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सत्कार झाला (१९५२) आणि त्यांच्या 'नाटकशास्त्र आणि तंत्र' या ग्रंथाला इंदूरच्या साहित्य सभेने बक्षिस मिळाल्याबद्दल श्री. ह. रा. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा एक जाहीर सत्कार झाला होता. त्यावेळी अनुक्रमे श्री. विश्वनाथराव वाबळे आणि आबासाहेब आचरेकर यानी पुढाकर घेतला होता. १९६८ साली त्यांचा षष्ठचब्दीपूर्ती समारंभ मा. ना. **बाळासाहेब देसाई** (गृहमंत्री महाराष्ट्र राज्य) यांचे अध्यक्षतेखाली मुंबईत फार मोठ्या प्रमाणात साजरा झाला. त्या निमित्त भारत सरकारचे त्यावेळचे गृहमंत्री **नामदार यशवंतराव चव्हाण** ता. १२

ऑगस्ट ६८ च्या आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, 'कॅप्टन माधवराव शिंदे हे एक पुरोगामी लेखक म्हणून महाराष्ट्रात परिचित आहेत. नाटच, लघुकथा व काव्य या सर्व क्षेत्रांत त्यांनी आपली लेखणी चालवली आहे. एवढेच नव्हे तर ते नाटचशास्त्राचे जाणकार आहेत. नाटचविषयक क्षेत्रात त्यानी केलेली ग्रंथरचना वाखाणण्यासारखी आहे. अशा या साहित्यिकाचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ साजरा करण्याची कल्पना चांगली आहे. अधिकाधिक मौलिक स्वरूपाची साहित्य-निर्मिती करण्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो, ही परमेश्वराजवळ प्रार्थना. माझ्या शुभेच्छा.'

त्या सत्कार समारंभाचे वेळी 'कॅप्टन शिंदे गौरव समिती' तर्फे त्यांना 'कॅप्टन शिंदे' हा गौरवग्रंथ अर्पण करण्यात आला होता. त्यात अनेक नामवंत लेखक-लेखिकांनी कॅप्टन शिंदे यांच्या अष्टपैलू जीवनाचे व व्यापक कार्याचे सम्यक दर्शन घडविले आहे. त्या ग्रंथाच्या आशीर्वादात्मक प्रस्तावनेत साहित्यसम्राट **आचार्य प्र. के. अत्रे** म्हणतात की– '...साठ वर्षांच्या वयाच्या मानाने त्यांची साहित्यिक आणि सामाजिक कामगिरी विपुल आहे. वाङ्मयाचे कोणतेहि क्षेत्र असो– काव्य असो, नाटच असो, कथा असो, निबंध असो– त्या क्षेत्रात त्यानी पदार्पण केले नाही, असे कधी झाले नाही. मुंबई शहरात गेल्या चाळीस वर्षात ज्या ज्या पुरोगामी स्वरुपाच्या सामाजिक चळवळी झाल्या, त्यामध्ये त्यानी धडाडीने भाग घेतला. एक पाय साहित्यसेवेत नि दुसरा पाय समाजसेवेत अशी त्यांची धीरगंभीर आणि उत्साहि मूर्ति वर्षानुवर्षे मुंबईच्या सार्वजनिक जीवनात उभी आहे. त्यांचे साहित्य विनोबा म्हणतात त्याप्रमाणे समाजसेवेतून निर्माण झाले आहे. मनाला जे रुचले नि पटले ते निर्भयपणे आणि धडाडीने लेखनात आणि भाषणात मांडण्यास आजपर्यंत ते कधी कचरले नाहीत. पण असे करताना त्यानी पुरोगामी विचारांची बाजू कधी सोडली नाही. त्यांची वृत्ती अभ्यासाची निव्यासंगाची आहे. नाटच आणि चित्रपट ह्यांचा शास्त्रीय विचार करून ते विचार ग्रंथस्वरुपाने प्रकट करणारा **असा लेखक केवळ महाराष्ट्रातच काय, पण भारतात झाला नाही.** म्हणूनच त्यांच्याबद्दल

महाराष्ट्रात सर्वत्र आदराची भावना आहे. उभ्या आयुष्यात त्यानी कोणाकडून स्वत:ची निंदा वा उपहास करून घेतलेला नाही. साहित्यात नि समाजसेवेत वावरणाऱ्याना ही गोष्ट कठीण आहे. त्या दृष्टीने ते अजात शत्रू आहेत असे म्हणता येईल. अशा या धडाडीच्या धिप्पाड साहित्यिकाला त्यांच्या एकसष्ठाव्या वाढदिवशी आम्ही आशीर्वाद देतो नि त्यांच्या हातून उत्तरोत्तर अशीच उज्वल साहित्य नि समाजसेवा घडो, अशी आम्ही परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.'

**वक्ते शिंदे** : दणदणीत पण खुसखुशीत भाषण करणारे लोकप्रिय वक्ते असा त्यांचा लौकिक आहे. श्री शंकरराव साळवी, वसंतराव भालेकर, नाटककार आबासाहेब आचरेकर इत्यादीनी अनेकदा अनेक समारंभात ठेवलेली त्यांची विनोद प्रचुर भाषणे अत्यंत गाजली. लालबागच्या गणेश मैदानातील त्यांच्या पल्लेदार भाषणांना तर हाजारो श्रोत्यानी दाद दिलेली आहे. मुंबईतील अनेक संस्थातून, हायस्कुलांतून व गणेशोत्सवातून त्यानी केलेली भाषणे चिरस्मरणीय ठरली. एकेकाळी ते 'नवमतवादी' म्हणून ओळखले जात असत. श्री. कृष्णराव मराठे (अखिल मराठे) यांच्याशी त्यानी जाहीर सभेत वैचारित झुंज दिली आणि त्यातही ते विजयी झाले. ता. २३ ऑक्टोबर १९३७ रोजी कल्याण येथे तेथील सरस्वती मंडळाच्या वतीने 'नवमतवाद' या विषयावर झालेले त्यांचे व्याख्यान त्यावेळी बरेच गाजले होते. बुरसटलेल्या आचाराविचारांवर आणि अज्ञानमूलक रुढींवर त्यानी आपल्या तिखट लेखणीने आणि धारदार वाणीने कडाडून हल्ला चढविला होता, तेव्हा स्वत:ला संस्कृति संवर्धक म्हणविणाऱ्या सनातन्यांनी त्यांचा निषेध करून त्याना त्रास देण्याचाही लघुउद्योग करून पाहिला. परंतु शिंदे न डगमता ताठ राहिले. मोडेन पण वाकणार नाही, अशी ताठर, टोकाची भूमिका न घेता, वाकेन पण जमीनदोस्त होणार नाही अशी सुवर्णमध्याची व्यवहारी व समजूतदार वृत्ती ठेवून ते आजपर्यंत सार्वजनिक जीवनात वागले, आणि हेच त्यांच्या लोकप्रियतेचे व यशाचे मर्म आसावे. त्यानी ढोलवडव्यांची टोळी आपल्याभोवती जमविली नाही, म्हणूनच ते तथाकथित बड्या-

बड्या मानपानापासून वंचित राहिले. परंतु त्याचा त्याना खेदही वाटला नाही आणि खंतही वाटली नाही. आपल्या लहानसान गुणांचेहि कौतुक करणाऱ्या मित्रांचे प्रेम हेच ते आपले बळ समजतात व त्यांचा आणि पत्रकार मित्रांचा ते कृतज्ञतेने नेहमीच साभार उल्लेख करतात.

**शिंदे यांचे अभिनय कौशल्य :**

शिंदे हे नाटककार म्हणून प्रसिद्धीला येण्यापूर्वी, स्टेज इफेक्ट ही काय चीज असते हे जाणून घेण्यासाठी ते श्री. अ. ह. गद्रे यांच्या मुंबई नाटिका सं. मंडळीत व्यवस्थापक व बालनट जॅकी कूगन राम आपटे याचे शिक्षक म्हणून काही काळ राहिले होते. म्हणूनच तेव्हा पासून 'शिंदेमास्तर' या नावाने ओळखले जाऊ लागले, हे पुष्कळाना माहीत नसेल. शिवाय नाट्याभिनयकला देखील त्याना त्यांच्या बालवयातच साध्य झालेली होती. पहिले महायुद्ध संपल्यानंतर सर्वत्र विजयोत्सव साजरे झाले. त्यावेळी वेंगुर्ले म्युनिसिपालिटीच्या मराठी शाळा नं. २ मध्ये मा. कृ. सिंदे हे चवथ्या इयत्तेत होते. विजयोत्सासाठी 'मनोविजय' या नाटकाचा प्रयोग सादर करण्याचे ठरले आणि त्यांत एक महत्त्वाची दुहेरी भूमिका बालमाधवाला देण्यात आली. म्हणजे वयाच्या ११ व्या वर्षीच त्यानी तोंडाला रंग फासून रंगभूमीवर आपल्या अभिनयाची पहिली चुणूक दाखवली. त्यानंतर त्यानी नाटकात भूमिका केली ती मामा वरेरकर यांच्या एकसष्ठाव्या वाढदिवसानिमित्त, ता. २५ एप्रिल १९४१ रोजी ऑपेरा हाऊसमध्ये झालेल्या 'सदा बंदिवान' या खास नाटचप्रयोगात. एका लेखकाच्या वाढदिवसानिमित्त नाटककारांनी व पत्रकारांनी भूमिका करून रंगभूमिवर सादर केलेला महाराष्ट्रातला तशा तऱ्हेचा तो एक आगळा, वेगळा आणि पहिलाच नाटचप्रयोग होता. मामांचा वाढदिवस, मामांचेच नाटक आणि साहित्यिकांबरोबर त्यांत खुद्द मामांची भूमिका असा एक अपूर्व नाटचप्रयोग होता तो. त्यांत मा. कृ. शिंदे यानी नायकाची भूमिका करून आपल्या अभिजात अभिनयकौशल्याचे दर्शन मुंबईच्या रसिकांना घडविले आणि सर्वांकडून शाबासकी मिळविली. एक रसिक विद्वान श्री. पु. मं. लाड (I. C. S.)

यानी व प्रा. र. धों. कर्वे यानी तो प्रयोग पाहून त्यांचे खूप कौतुक केले. त्या प्रयोगासाठी 'साहित्य झब्बूशाही विध्वंसक' मंडळाने पुढाकार घेतला होता. मंडळाचे सहचिटणीस अप्पा पेंडसे यानी आर्थिक बाजू संभाळून एक भूमिकाही त्या नाटकात केली होती. नाटचप्रयोगाचा खर्च वजा जाता उरलेली घसघशीत रक्कम आणि पोशाखाच्या दोन जोड्या मामांना समारंभपूर्वक अर्पण करण्यात आल्या होत्या. त्या प्रयोगाचे वेळी त्यावेळच्या नवभारत प्रकाशन संस्थेचे रघुनाथराव देसाई यानी नाटकाची खास सचित्र रंगावृत्तीही प्रसिद्ध केली होती.

त्या नंतर १९४५ साली मुं. म. सा. संघातर्फे संपन्न झालेल्या नाटचमहोत्सवातील साहित्यिकांच्या 'त्राटिका' या नाटचप्रयोगात उपनायकाची (रंभाजीची) भूमिका त्यानी केली. नायकाची (प्रतापरावाची) भूमिका केली होती आचार्य अत्रे यानी. पुढे ता. २५ मार्च १९४८ रोजी ऑपेरा हाऊसमध्ये त्यांचे '४२ चे आंदोलन' हे नाटक थाटामाटात रंगभूमीवर आले. त्यांत त्यानी स्वतः श्रीमती दुर्गाबाई खोटे यांच्या बरोबर एक महत्त्वाची भूमिका केली आणि परत एकदा आपल्या अभिनय कौशल्याचा प्रत्यय आणून दिला. दुर्गाबाई खोटे यानी त्या नाटकात मुख्य पण कठीण भूमिका सफाईदारपणे करून रंगभूमीवर प्रथमच पदार्पण केले, म्हणून इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी रकाने भरभरून त्या नाटकाची व दुर्गाबाई खोटे आणि कॅप्टन शिंदे यांच्या अभिनय कौशल्याची अपरंपार स्तुती केली होती.

**खडतर तपस्या** : कॅप्टन शिंदे यांची साहित्यसेवा म्हणजे एक खडतर तपस्या आहे. त्या तपस्येच्या यशाचे श्रेय ते आपल्या सेवाभावी व सहनशील वृत्तीच्या आपल्या पत्नीला देतात. आपल्या जीवनप्रवासात खडकाळ आणि खडबडीत वाटेवरून संसाराचा खटारा हसतमुखाने ओढणाऱ्या आपल्या पत्नी सौ. अहिल्याबाई शिंदे आणि त्यांच्या सहकारी सौ. बचुबाई शिंदे यांचा ते कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतात. ता. १२ सप्टेंबर १९८५ रोजी, माझ्या पुढाकाराने 'संरक्षण शास्त्र आणि तंत्र' हे कॅप्टन शिंदे यांचे पुस्तक शिक्षणमंत्री प्रा. राम मेघे यांच्या हस्ते

समारंभपूर्वक प्रसिध्द झाले, तेव्हा शिंदे म्हणाले की, 'आपण सुमारे ५५ वर्षांपूर्वी घेतलेल्या लेखनव्रताचे आज उद्यापन होत आहे.' या त्यांच्या उद्गारावरुन त्यांच्या उदात्त लेखन प्रवृत्तीची ओळख पटू शकेल. वरील ग्रथाला जनरल वैद्य यांचा पुरस्कार लाभला आहे.

**आद्य मराठी ग्रंथ :–** कॅप्टन शिंदे यांच्या दीर्घ व्यासंगाची आणि अभ्यासू वृत्तीची साक्ष देणारे त्यांचे जे ग्रंथ आहेत, त्यांतील १) सिनेमा शास्त्र आणि तंत्र, २) नाटक शास्त्र आणि तंत्र, ३) नाटयसंहिता, ४) मराठी रंगभूमी– उगम आणि विकास, ५) मराठी वृत्तपत्र व्यवसाय आणि शास्त्र, ६) प्राचिन अर्वाचिन युध्द विज्ञान, ७) पत्रकार आणि पत्रकारिता, ८) आधुनिक शस्त्रास्त्रे–इतिहास आणि विकास, ९) संरक्षण शास्त्र आणि तंत्र, १०) तमाशा (लावणी) नृत्य– महाराष्ट्राचे शास्त्रीय नृत्य. हे ग्रंथ मराठी भाषेतील तशा तऱ्हेचे आद्य ग्रंथ ठरले, हे कॅप्टन शिंदे यांना भूषणावह आहे. थोडक्यात म्हणजे वाङ्मयवीर कॅप्टन शिंदे हे सव्यसाची तपस्वी साहित्यिक आहेत आणि त्यानी अनेक नवोदितांना मार्गदर्शन करून प्रोत्साहनही दिलेले आहे. त्या दृष्टीने ते नाटच आणि साहित्यविद्येचे द्रोणाचार्यच आहेत असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. त्यांच्या लहानपणापासून त्यांना ओळखणारे त्यांचे बालमित्र श्री. गजानन नारायण दाभोळकर आणि श्री. अच्युत बा. परमानंद हे दोघेच वयोवृद्ध गृहस्थ हयात आहेत आणि मुंबईतील श्री. र. गो. सरदेसाई, अॅ. मधुकर व्ही. राव, ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर आणि श्री. मनोहर सी. केळूसकर हे त्यांच्या सार्वजनिक आणि साहित्यिक जीवनाचे साक्षीदार आहेत. कॅप्टन शिंदे हे ३१, खोताची वाडी, मुंबई नं. ४०० ००४ येथे गेली ५० वर्षे राहात आहेत. आता वार्धक्यामुळे ते सार्वजनिक जीवनापासून अलिप्त असले तरी त्यांचे लेखनवाचन मात्र पूर्ववत् चालू आहे.

**

# कॅप्टन मा. कृ. शिंदे (मिलिंदमाधव) यांची साहित्य संपदा

## गद्य–पद्य आणि इतर

**ललित व गंभीर विषयांवरील पुस्तके–१६.**

१) सिनेमा–शास्त्र आणि तंत्र. (भारतीय भाषेत एकमेव)
२) शुभसंदेश (विवाहितांसाठी)
३) सुखाची जोड " ,,
४) भगवान बुद्ध (धर्म आणि संघ–छायाचित्रांसह)
५) नाटक शास्त्र आणि तंत्र (मराठीतील एकमेव)
६) नाट्यसंहिता (लोकनृत्ये, शास्त्रीय नृत्ये, नाट्यकला)
७) Shinde 's Dictionary of Cine Art and Film Craft.
८) मराठी वृत्तपत्र व्यवसाय : इतिहास आणि शास्त्र
९) मराठी रंगभूमी : उगम आणि विकास (खरा इतिहास)
१०) युध्दविज्ञान
११) आधुनिक शस्त्रास्त्रे
१२) संरक्षणशास्त्र आणि तंत्र
} युद्धकलेवरील पुस्तके
१३) पत्रकार आणि पत्रकारिता (नवोदित पत्रकारांसाठी)
१४) महाराष्ट्राचे शास्त्रीय नृत्य– लावणीनृत्य– तमाशा
१५) गीता मर्म आणि माहात्म्य (आगामी)
१६) मम आत्मनः (संकल्पित आत्म चरित्र)

**नाटके व त्रोटके** (एकांकिका)– **१३**

१) बंडखोर कुमारी (सामाजिक नाटक)
२) गुंतागुंत अर्थात दोरीचा साप (विनोदी)
३) गृहलक्ष्मी (विनोदी)
४) बनावट बायको (विनोदी)

५) अर्थाचा अनर्थ (विनोदी त्रोटक)
६) ४२ चे आंदोलन (राष्ट्रीय नाटक)
७) सोन्याचा दिवस (स्त्रीपात्ररहित त्रोटक)
८) मातृदेवो भव: (पुरुषपात्ररहित त्रोटक)
९) नाजुक नवरा (विनोदी त्रोटक)
१०) संत जनाबाई (पुरुषपात्ररहित नाटक)
११) अमृत मंत्र (संस्कारक्षम त्रोटक)
१२) चोरांचे संमेलन (विनोदी त्रोटक)
१३) धन्य आनंद दिन (आगामी सामाजिक नाटक)

## कथा संग्रह-७

१) देवपूजा आणि इतर गोष्टीं (दुर्मिळ)
२) तीन बोलपट (साक्षरतामालेसाठी)
३) ठिणग्या आणि टिकल्या (दुर्मिळ)
४) गुलाबी गप्पा (विनोदी गोष्टी)
५) शुभं भवतु (३ री आवृत्ती)
६) सती पंचक (पौराणिक कथा-दुर्मिळ)
७) गणपतीच्या गोष्टी

## इतर पद्य लेखन- ४

१) राष्ट्रीय पद्यावली (प्रभात फेरीची गाणी १९३० साली जप्त झाली)
२) गांधी माहात्म्य- म. गांधीचें ओवींमय राष्ट्रीय चरित्र
(एकाध्यायी १९३० दोन अध्यायी १९४८)
३) मोहनमाळ (कविता संग्रह- १९३२- दुर्मिळ)
४) गुलगुल गाणी (ध्वनिमुद्रित गीतांचा संग्रह)

## इतर लेखन व कार्य

१) अनेक नियतकालिकांतून प्रासंगिक लेखन.
२) आकाशवाणीसाठी श्रुतिका, कथाकथन, चित्रपटपरीक्षणे वगैरे.
३) लष्करी विविध चित्रपटांसाठी व माहितीपटांसाठी कथा-पटकथा लेखन, दिग्दर्शन व भारतसरकारच्या माहितीपटासाठी आणि वार्तापटांसाठी अनेक वर्षे केलेले भाष्यलेखन व निवेदन.

४) महाराष्ट्र सरकारच्या माहितीपटांसाठी कथा-पटकथा लेखन, दिग्दर्शन व माहितीपट निर्मिती व निवेदन.

५) अनेक माहितीपट निर्मात्यांच्या चित्रपटांसाठी कथापटकथालेखन, भाष्यलेखन व निवेदन.

६) अनेक जाहिरातपटांसाठी भाष्यलेखन, निवेदन.

७) मराठी विश्वकोशासाठी केलेले लेखन.

८) इतर लेखकांच्या पुस्तकांसाठी प्रस्तावना लेखन.

९) पत्रकार म्हणून केलेले लेखन व संपादन, पुस्तकपरीक्षणे व चित्रपट परीक्षणे वगैरे.

१०) वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. साठी त्यांच्या चित्रपटगृहात लागलेल्या चित्रपटाचे काही वर्षे केलेले जाहिरात- लेखन, वगैरे.

११) अनेक चर्चित भाषणे, नाट्यप्रयोगांची उद्घाटने, अनेक सभासंमेलनाचे अध्यक्ष, क्रीडास्पर्धेच्या वेळी प्रमुख वक्ता म्हणून भाषणे वगैरे.

१२) अनेक नाट्यलेखन स्पर्धांचे व चित्रपट नाट्यप्रयोग स्पर्धांचे परीक्षक.

*

# भक्तकवि मिलिंदमाधव कृत धार्मिक पोथ्या व पुस्तके

## सन १९८६

१) श्रीसाई महात्म्य (अनेक आवृत्त्या)
२) श्रीसाई पूजा
३) श्रीसिध्दारूढ स्वामी माहात्म्य
४) अष्टविनायक स्तोत्र माहात्म्य
५) नऊ ग्रहांची नऊ स्तोत्रे
६) भगवानबुद्ध माहात्म्य
७) सिद्धिविनायक वरद स्तोत्र
८) श्रीसंतोषी माहात्म्य, व्रतकथा, पूजा
९) देवी वरद स्तोत्र
१०) शिववरद स्तोत्र
११) सोमनाथ माहात्म्य
१२) श्रीलक्ष्मी माहात्म्य, व्रतकथा (अनेक आवृत्त्या)
१३) सत्यविनायक व्रतकथा
१४) महामृत्युंजय वरद स्तोत्र
१५) श्रीदत्तमाहात्म्य (पिवळं गुरुवार)
१६) श्रीषष्ठीदेवी माहात्म्य
१७) श्रीसरस्वती स्तोत्र
१८) संकष्ट चतुर्थी माहात्म्य (तीन कथासंग्रह)
१९) श्रीज्ञानेश्वर लीलामृत (२ अध्याय)
२०) मल्हारी माहात्म्य
२१) नवनाथ लीलामृत
२२) अंगारकी चतुर्थी माहात्म्य
२३) मुक्तिमार्ग प्रदीप (योगमार्ग दर्शन)
२४) श्रीसद्गुरू स्तोत्र
२५) आधुनिक आरत्या (देवदेवतांच्या आरत्या)
२६) काळभैरव वरद स्तोत्र


२७) श्रीसंतोषी स्तोत्र
२८) एकवीरादेवी माहात्म्य
२९) नवदुर्गा कवच (सार्थ)
३०) जयदेवी संतोषी (सिनेमातील कथेसह गद्य)
३१) व्रतसप्ताह (सात दिवसांची सात व्रते- गद्य)
३२) एकादशी माहात्म्य, व्रतकथा
३३) पुळे गणपती स्तोत्र, माहात्म्य (आद्य)
३४) अधिकमास माहात्म्य (सचित्र)
३५) राधाकृष्ण प्रेम माहात्म्य
३६) गायत्री स्तोत्र माहात्म्य
३७) महालक्ष्मी साधना व्रत
३८) अक्कलकोट स्वामी माहात्म्य
३९) गायत्री मंत्र बोध (उपासना–गद्य)
४०) तुमचे लक्ष्मीपूजन तुम्हीच करा
४१) शिव आराधना, उपासना
४२; दत्त आराधना
४३) प्रभावी गणेशव्रते (गद्य)
४४) गणेशक्षेत्रे व गणेशतीर्थे (सचित्र)
४५) गोंदवलेकर महाराज माहात्म्य
४६) देवी आराधना, उपासना
४७) शनिवार, श्रावण शनिवार माहात्म्य
४८) हनुमान माहात्म्य व कवच
४९) सोमवार, श्रावण सोमवार माहात्म्य
५०) प्रदोष व्रतकथा
५१) नवरात्र माहात्म्य
५२) सिंहस्थ माहात्म्य (कथेसह, सचित्र)
५३) विठ्ठलरखुमाई स्तोत्र माहात्म्य
५४) हाजीमलंगबाबा स्तोत्र माहात्म्य
५५) मांगरीश– शांतादुर्गा स्तोत्र माहात्म्य
५६) ऋषीपंचमी व्रतकथा, पूजा, माहात्म्य
५७) वारकरी माहात्म्य
५८) शनिमहिम्न स्तोत्र
५९) नरसिंह स्तोत्र माहात्म्य व धावा

६०) महामारुति स्तोत्र
६१) एकाध्यायी ओवीगीता (१८ वा अध्याय)
६२) मिलिंदमाधवी ओवीगीता (संपूर्ण)
६३) साटममहाराज स्तोत्र
६४) श्रीअंबाबाई स्तोत्र
६५) ज्योतिबा स्तोत्र
६६) वरदविनायक स्तोत्र
६७) अष्टगणेश लीलामृत
६८) अरुंधती सौभाग्यव्रत, पूजा, कथा (गद्य)
६९) शाबरी स्तोत्र
७०) विनायकी चतुर्थी माहात्म्य, व्रतकथा, नाममंत्र स्तोत्र
७१) बगलामुखी स्तोत्र

एकूण १११, लेखनकाल : इ. स. १९३० ते १९८६.

**

# कॅप्टन शिंदे यांना मिळालेली पदके




पुढची बाजू                                   मागची बाजू

१. दुसऱ्या जागतिक महायुद्धकाळात केलेल्या लष्करी सेवेबद्दलचे 'वॉर मेडल'(युद्ध पदक)

२. मुंबई मराठी पत्रकार संघाने सन्माननीय सदस्यत्व बहाल करताना समारंभपूर्वक दिलेले पदक ( २१-६-७८ )

३. एक ज्येष्ठ पत्रकार म्हणून गौरव करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौर माननीय बाबुरावजी शेट्ये यांच्या हस्ते मिळालेले पदक ( २०-३-८१ )